# डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,अकोला

वाचा: १. महा. शा. कृषि व पदुम विभाग शासन निर्णय क्र. कृषिवि-३७२०/प्र.क्र.१४६/६-अे, दि. १०.११.२०२३
२. शासन परीपत्रक क्रमांक : वेतन-२०२३/प्र.क्र.-१३/सेवा-३, दि. २८.०६.२०२३
३. विद्यापीठ परीपत्रक जाक्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३/२७०१, दि. ०१.०१.२०२४.

## प रि प त्र क

क्र.बीजीए/पेन्शन/सु.आ.प्र.यो./०७/२०२६./1973 दिनांकः- 12/08/२०२६

या विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/कार्यालय प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी यांना कळविण्यात येते की,

संदर्भ क्र. १ व २ चे शासन निर्णय तसेच संदर्भ क्र. ३ चे विद्यापीठ परीपत्रकानुसार कृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने वेळोवेळी प्रशासकीय आदेश निर्गमित झालेल्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सदर लाभ अनुज्ञेय ठरतात.

वरीलप्रमाणे ज्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे प्रकरणी वेतननिश्चितीची पडताळणी ही संबंधित विभागामार्फत अधिदान व लेखाधिकारी यांचेकडुन झालेली आहे व त्यानुसार त्यांना सुधारीत लाभ/थकबाकी प्रदान करण्यात आलेली सुधारीत प्रकरणे या विभागास प्राप्त झालेली असुन त्याबाबतची पुढील कार्यवाही या कार्यालयाद्वारे सुरू आहे.

परंतु असे निदर्शनास आले आहे की, आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत बरीच सुधारीत प्रकरणे अद्यापपर्यंत या विभागास अप्राप्त आहेत. तेव्हा आपल्या आस्थापनेवरील दि. ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय असलेले अधिकारी/कर्मचारी यांची प्रकरणे या विभागास मुळसेवापुस्तक/गणनाज्ञाप/अंतिमवेतन प्रमाणपत्र/वचनपत्र/बंधपत्र/विद्यापीठ आदेश/वेतननिश्चितीच्या प्रतीसह द्विप्रतीत या कार्यालयास पाठविण्यात यावी.

तेव्हा आपल्या आस्थापनेवरील उपरोक्त दिनांकापर्यंत आश्वासित प्रगती योजना लागु असलेले, लागु होणारे अधिकारी/कर्मचाऱ्यांची निकाली निघालेली प्रकरणे, प्रलंबित प्रकरणाबाबतची माहिती तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय आहेत किंवा नाही याबाबतची पडताळणी मुळसेवापुस्तकावरून करण्यात येवुन या परीपत्रकासोबतच्या विवरणपत्रामध्ये भरून या कार्यालयास पाठविण्यात यावी.

करीता या परीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आपले आस्थापनेवरील आश्वासित प्रगती योजना लागु असलेले अधिकारी/कर्मचारी यांची सुधारीत प्रकरणे दि. ३१. ऑगस्ट २०२६ पर्यंत सोबत दिलेल्या विवरणपत्रासह या कार्यालयास सादर करावी. प्रकरणे सादर करण्यास विलंब झाल्यास सर्वस्वी जबाबदारी कार्यालय प्रमुख व संबंधित काम पाहणारे यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू यांचे मंजुरी व आदेशान्वये.

स्वाक्षरीत/-
(प्रिती वि. रोडगे)
कुलसचिव
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**प्रतः- माहिती व योग्य कार्यवाहीकरिता रवाना.**

१) नियंत्रक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला.

२) नियंत्रण अधिकारी,(सर्व)------------------------------------------------------------------------------------------------

३) कार्यालय प्रमुख सर्व --------------------------------------------------------------------------------------------------

४) अधिदान व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला/नागपूर.

५) प्रभारी अधिकारी, संगणक विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

उपकुलसचिव (आस्था)
डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.

**कार्यालयाचे नांव :-**

| दि. ३१.०८.२०२६ पर्यंत सुआप्रयो अनुज्ञेय असलेली सुधारीत सेवानिवृत्ती प्रकरणे (एकुण संख्या) | सादर केलेली प्रकरणे (एकुण संख्या) | प्रलंबित असलेली प्रकरणे (एकुण संख्या) | शेरा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

आहरण व संवितरण अधिकारी